# प्रेस नोट दिनांक २८/०३/२०१९

## दरोडेखोरांना गुन्हयास प्रतिबंध करताना पोलीसांवर फायर करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न

दि. २८/०२/२०१९ रोजी पहाटे ०४/०० वा. चे सुमारास खडकी पोलीस ठाणे हद्दीमध्ये दरोडे खोरांचे टोळीने वर्धमान ज्वेलर्स, रविराज हरिटेज, शॉप नंबर ६, भाऊ पाटील रोड, पुणे या दुकानाचे शटरची कुलपे तोडुन दुकानामध्ये प्रवेश करुन सदर दुकानातील दागीने व रोख रक्कम असा ऐवज लुटला.

त्यावेळी सदर भागात खडकी पोलीस ठाणेकडील बोपोडी बिट मार्शल चे पोलीस कर्मचारी पो. शि. ९९७३ माधव जळपतराव गोपनर व पो.शि. १०६६५ स्वप्नील भरत घोलप यांना पेट्रोलींग दरम्यान सदर दुकानाचे शटर उचकटलेले दिसलेवरुन त्यांना दुकानामध्ये चोरीचा प्रकार घडल्याचे लक्षात आल्याने त्यांनी लागलीच त्यांची दुचाकी सदर दुकानाचे दिशेने घेतली व दुचाकीवरुन खाली उतरुन दुकानाचे दिशेने जात असताना त्यांना पाहुन दुकानामध्ये असलेले दरोडेखोर हे दुकानातील दागीन्यांचे ड्रॉवर हातामध्ये घेवुन रस्यावर लावलेले त्यांचे चारचाकी गाडीचे दिशेने पळत सुटले ते पाहुन पोलीस कर्मचारी गोपनर व घोलप यांनी त्यांचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. त्यावेळी सदर दरोडे खोरांपैकी एकाने पोलीस कर्मचारी गोपनर यांना “आगे मत बढो, आगे बडेंगे तो जान से मार दुंगा” असे म्हणाला. परंतु त्याचे धमकीला न जुमानता पोलीस कर्मचारी त्यांचा पाठलाग करु लागले त्यादरम्यान एका दरोडेखोराचे हातातील दागीन्यांचा लागडी ड्रॉवर रस्त्यावर पडला.

पोलीस कर्मचारी त्यांचा पाठलाग करत असल्याचे पाहुन धमकी देणारे दरोडे खोराने त्याचेकडील अग्निशस्त्राव्दारे पोलीस कर्मचारी यांचेवर दोन वेळा फायर करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा निशाना चुकल्याने पो.शि. गोपनर व पो. शि. घोलप बचावले. फायर होवुन देखील सदर पोलीस कर्मचारी हे त्यांचा पाठलाग करीत होते परंतु दारोडेखोर हे त्यांचेकडील चारचाकी काळसर रंगाचे गाडीमध्ये बसुन भरदाव वेगाने मुंबई पुणे हायवे चे दिशेने पसार झाले. त्यांचा पोलीस कर्मचारी यांनी त्यांचेकडील दुचाकीवरुन पाठलाग केला परंतु बोपोडी चौकातुन पुढे दरोडेखोरांची गाडी नेमकी कोठे गेली हे समजु न शकल्याने आरोपी मिळुन आले नाहीत. सदर प्रकरणी अनोळखी दरोडेखोरांविरुध्द खडकी पोलीस ठाणेस दि. २८/०२/२०१९ रोजी गु. र. नं. ९६/२०१९ भा.दं.वि. क. ३०७, ३९५, ३९७ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३(२५), २७ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

**मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी सदर कर्मचारी यांचा सदर उत्कृष्ट कामगीरीबाबत दि. २७/०३/२०१९ रोजी सत्कार करुन भवीष्यात देखील सदर कर्मचारी यांनी अशाच प्रकारे चांगली कामगीरी करावी या उदात्त हेतुने नमुद दोन्ही पोलीस कर्मचारी यांना प्रत्येकी ७५००/- रुपये व जी. एस. टी. असे बक्षीस मंजुर केले आहे.**

**सदर उत्कृष्ठ कामगीरी १) पो. शि. ९९७३ माधव जळपतराव गोपनर २) पो. शि. १०६६५ स्वप्नील भरत घोलप खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी केली आहे.**

## पो.कॉ.स्वप्नील घोलप खडकी पो.स्टेशन




## पो.कॉ. माधव गोपनर खडकी पो.स्टेशन

